FAO/ICD/2015-16/967

# मुंबई विद्यापीठ

केंदिय मुल्यांकन देयक कक्ष,
वित्त व लेखा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८
दिनांक – २७ ऑगस्ट, २०१५

परिपत्रक :—

मा. कुलगुरूंच्या FAO/ICD/2015-16/293 दिनांक ०६ मे,२०१५ च्या आदेशान्वये सर्व शाखांचे मुल्यांकन केंद्रप्रमुख/प्राध्यापक/परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ सर्व संबधित उपकुलसचिव/सहाय्यक कुलसचिव/कक्षांचे प्रमुख यांना असे कळविण्यात येते की,

"महाराष्ट्र विद्यापीठ लेखा संहिता" (The Maharashtra Universities Account Code) पृष्ठ क्र. ३४ वरील तरतुदीच्या अनुषंगाने 'Remuneration' व सर्व प्रकारच्या मानधनांची प्रदाने धनादेशाद्वारे करण्यात यावीत, असे आदेश मा. कुलगुरूंनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये पारित केले होते. परंतु सदर आदेश प्राप्त होण्यापूर्वी प्रथम सत्र २०१५ च्या परिक्षांच्या मुल्यांकनाकरीता अग्रीम रकमांचे धनादेश मुल्यांकन केंद्रांना देण्यात येऊन, त्यांनी वरील सर्व प्रदाने रोखीने केलेली होती.

याबाबत आपणांस असे कळविण्यात येते की, सदर आदेशानुसार द्वितीय सत्र २०१५ पासून Remuneration ची सर्व देयके, देयक कक्ष, खो.क्र. ४५, वित्त व लेखा विभाग, महात्मा फुले भवन, विद्यानगरी, मुंबई – ४०००९८ यांचेकडे अग्रेषित करावीत, जेणेकरून वरील सर्व प्रदाने धनादेश/RTGS ने करणे रोख विभागास शक्य होईल.

वित्त व लेखा अधिकारी

प्रति,
१) परिक्षा नियंत्रक, महात्मा ज्योतीराव फुले भवन,मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई—९८.
२) सर्व विद्याशाखांच्या मुल्यांकन केंद्रांचे केंद्रप्रमुख व सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.